


'गोल्डन रिट्रीट' लक्झरी रिटायरमेंट होम्सबाबत पणजीत गुरुवारी झालेल्या पत्रकार परिषदेत माहिती देताना विनय भासीन. बाजूस मोहित गुप्ता व अॅलन व्हिएगश. (संदीप देसाई)

# गोव्यात आता 'गोल्डन रिट्रीट' लक्झरी रिटायरमेंट होम्स

## निवृत्त झालेल्या लोकांसाठी शिरदोन येथे निवासाची सोय

पणजी, ता. २२ (प्रतिनिधी) : निवृत्त झालेल्या लोकांसाठी सर्व साधनसुविधांनी युक्त असे घर उपलब्ध करून देण्याची संकल्पना पॅलॅसिओ ग्रुपने गोव्यातही राबवली आहे. शिरदोन येथे 'गोल्डन रिट्रीट - लक्झरी रिटायरमेंट होम्स'चे बांधकाम सुरू असल्याची माहिती 'पॅलॅसिओ ग्रुप'चे विनय भासीन यांनी गुरुवारी घेतलेल्या पत्रकार परिषदेत दिली. यावेळी मोहित गुप्ता व अॅलन व्हिएगश उपस्थित होते.

भासीन पुढे म्हणाले, की 'पॅलॅसिओ ग्रुपने रिटायरमेंट होम्स उभारण्याची संकल्पना पुणे, लवासा व दक्षिण भारतात राबवली असून ती यशस्वी झाली आहे. त्यामुळे गोव्यातही हीच संकल्पना आम्ही राबवत असून शिरदोन येथे १० एकरमध्ये रिटायरमेंट होम्सचे बांधकाम सुरू आहे. सध्या येथे आम्ही दोन इमारती बांधत असून त्यामध्ये ३२ फ्लॅट आहेत. २४ लाखांपासून पुढे अशा येथील फ्लॅटच्या किमती असणार आहेत. होम्स खरेदी करणाऱ्या कुटुंबातील एक व्यक्ती ५५ वर्षांवरील असण्याची अट आहे. दाबोळी विमानतळ व पणजी शहराकडे येण्यासाठी शिरदोन येथील होम्सचे ठिकाण सोयीचे आहे. सदर होम्सची इमारत पर्यावरणप्रिय पद्धतीने उभारली जात आहे. तसेच येथून बांबोळी व शिरदोन समुद्रकिनारा जवळ असून फिरण्यासाठी वृद्ध व्यक्तींना आल्हाददायक वातावरण आहे.' अधिक माहितीसाठी रोमाईका करंदीकर (९२२५९०६६६०) यांच्याशी संपर्क साधावा.

### 'रिटायरमेंट होम्स'ची वैशिष्ट्ये

होम्समध्ये विविध कलाकुसर असलेले फर्निचर उपलब्ध केले जाणार आहे. तसेच आरोग्यसुविधा, फार्मसी, किराणा दुकान, लाँड्री, टेनिस कोर्ट, बँकिंग साहाय्य, स्वीमिंग पूल, ग्रंथालय, कम्युनिटी हॉल, सुरक्षारक्षक, शॉपिंगला जाण्याची सोय, निवांतक्षणी बसण्यासाठी आकर्षक बाग, टेबल टेनिस, स्नूकर खेळण्याची इनडोअर व्यवस्था असणार आहे.

GOMANTAK
23rd August 2009